वाचले:- १.महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम (सरकारी जमीनीची विल्हेवाट करणे ) नियम १९७१ चे नियम

२.मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१ (१) अ

३.उपविभागीय अधिकारी तळोदा भाग तळोदा यांचेकडील पत्र क्रमांक ०५/गावठाण/कावि.३८९.दिनांक २९/८/२००५

४ अध्यक्ष पिपल्य एज्युकेशन सोसायटी तळोदा यांचा अर्ज दिनांक ९/१/२००४

---

क्रमांक २००५/ब/कक्ष.२/गावठाण/कावि-
जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार
नंदुरबार दिनांकः- ५ /१/२००६

**आदेश,**

अध्यक्ष, पिपल्स एज्युकेशन सोसायटी तळोदा तालुका तळोदा जिल्हा नंदुरबार यांनी मौजे बोरद तालुका तळोदा येथील सरकारी स.न. १८/१ क्षेत्र ९.३६ पैकी ४००० चौ.मी.जागा शाळेच्या क्रिडागणासाठी मागणी केलेली आहे. तहसिलदार तळोदा यांनी चौकशी करुन प्रस्ताव सादर केला आहे.

मौजे बोरद तालुका तळोदा जिल्हा नंदुरबार येथील स.न.१८/१ क्षेत्र ९.३६ पैकी ४००० चौ.मी. जागा अध्यक्ष पिपल्स एज्युकेशन सोसायटी तळोदा यांना वितरीत करणे बाबत ग्रामपंचायत बोरद तालुका तळोदा यांनी दिनांक १५/९/२००३ अन्वये संमतीदर्शक ठराव दिलेला आहे. सदर संस्थेने क्रिडांगणासाठी ~~४००० चौ.मी. जमीनीची~~ मागणी केलेली ~~आहे त्या बाबत~~ मोजणी नकाशा पानांक ३९ वर सामील आहे.

संस्थेस जागा वितरीत करणे बाबत उपविभागीय अधिकारी तळोदा भाग तळोदा यांनी शिफारस केलेली आहे. मागणी सरकारी स.न.१८/१ क्षेत्र ९ हे ३६ आर हे ग्रामपंचाय बोरद तालुका तळोदा कडे निहीत केलेले आहे.म्हणुन मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१ (१ अ) / **मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार ग.न.१८/१ क्षेत्र ९ हे ३६ आर पैकी ४००० चौ.मी. क्षेत्र मौजे बोरद ग्रामपंचायतीकडुन काढुन , महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २२ अन्वये सरकारी पडीतीत दाखल करुन** महाराष्ट्र जमीन महसुल (सरकारी जमीनीची विल्हेवाट करणे ) नियम १९७१ चे नियम ७ अन्वये **क्रिडागणासाठी ~~४००० चौ.मी. क्षेत्र~~ प्रतिवर्षी नाममात्र भाडे १ रुपया आकारुन १५ वर्षे भाडे पट्यांने** उक्त संस्थेस या आदेशाच्या दिनांकापासुन खालील अटी व शर्तीवर मंजुर करीत आहे.

➢ **अटी व शर्ती**

१.क्रिडागण हे सर्व जाती धर्मांचे विद्यार्थ्यांना वापरणेस संस्थेकडुन कोणतीही अट घालणेत येणार नाही.

२.जागेचा वापर हा क्रिडांगणा शिवाय इतर प्रयोजनार्थ करता येणार नाही.

३. क्रिडागणाचे मंजुर जागेवर संरक्षक भिंत व्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचे संस्थेस बांधकाम करता येणार नाही.

४. संस्थेस शैक्षणिक विभागाकडुन सलग मान्यता न मिळाल्यास प्रस्तुत आदेश रद्द समजण्यात येतील.

५.क्रिडागणाची जागा अन्य कोणासही बक्षीस /गहाण/विक्री अथवा अन्य मार्गाने हस्तांतरण करता येणार नाही. अथवा विल्हेवाट लावता येणार नाही.

६.सदर आदेश मिळाले पासुन संस्थेने ३० दिवसाचे आत विहीत नमुना नंबर २ मध्ये सनद मंजुर करुन घेणे बंधनकारक राहील.

७.राज्य शासनास स्वताच्या प्रयोजनासाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक वाटेल तर उक्त मंजुर जमीन,तिच्यावर बसविण्यात आलेल्या वास्तु व बांधकाम यासह,राज्य शासनास परत घेता येईल, आणि उक्त जमीन अशा प्रकारे आवश्यक असल्याबद्यलचे जिल्हाधिका-याच्या सहीचे प्रतिज्ञापत्र हे, प्रतिग्रहिता व राज्य शासन यांच्यात निर्णायक असेल.

८.प्रस्तुतचे आदेश कोणत्याही क्षणी विनासुचना मागे घेणे / संस्थेकडुन जमीन काढुन घेणे इत्यादी अधिकार शासनाने राखुन ठेवलेले आहे.

९.वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जागेचा ताबा संस्थेकडुन काढण्यात येईल त्या पोटी कोणताही मोबदला संस्थेला दिला जाणार नाही.

(जयंत गायकवाड)
जिल्हाधिकारी नंदुरबार .

प्रतः- अध्यक्ष पिपल्य एज्युकेशन सोसायटी तळोदा तालुका तळोदा.

प्रतः- म.उपविभागीय अधिकारी तळोदा भाग तळोदा यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.

प्रतः- म.तहसिलदार तळोदा यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाही साठी रवाना.

२/- उपरोक्त आदेश बाबत गावचे दप्तरी आवश्यक त्या फेरफार नोंदी घेण्यात याव्यात व दुरुस्त उतारे अवलोकनार्थ सादर करावे. आदेशातील शर्तीचे उल्लंघन होणार नाही या बाबत योग्य ती दक्षता घ्यावी. सोबत मुळ संचिका पानांक १ ते अभिलेखार्थ परत करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी नंदुरबार करीता.